बोरीवलीतील प.पू.श्री शिरोडकर गुरुजी प्रणित
श्री दत्तजयंती सप्ताह सोहळा सुरू

■ मुंबई

प.पू.श्री शिरोडकर गुरुजी प्रणित दत्त मंदिर आणि अध्यात्म केंद्र बोरिवली (प.) येथे श्री दत्तजयंती सप्ताह सोहळा सुरू झाला आहे. हा सोहळा बुधवार ११ डिसेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमाच्या आयोजनाने पार पडणार आहे.

या दत्तजयंती सप्ताहात दररोज पूजन, अभिषेक, गुरुचरित्र पारायण, भजन, पार पडणार आहे. तसेच रविवार ८ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते ११ पर्यंत मोफत वैद्यकीय चिकित्सा, भजनाचा डबलबारी जंगी सामना तर बुधवार ११ डिसेंबर रोजी दत्तजयंती सोहळा, आरती, तिर्थप्रसाद, भव्य पालखी मिरवणूक, दत्त भंडारा आयोजित केला आहे.

चेंबूरच्या अयोध्यानगरात
११ रोजी दत्तजयंती उत्सव

■ मुंबई

चेंबूरमधील वाशीनाका परिसरातील अयोध्या नगरातील ओम भवानी सोसायटीतर्फे बुधवार ११ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता दरवर्षी प्रमाणे दत्तजयंती उत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त भजन कीर्तन व महापूजेचा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी परिसरातील भाविकांनी तिर्थप्रसाद आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्थानिक रहिवाशी दीपक चाळके यांनी केले आहे.

दत्त जयंती विशेष

रेवदंडा चौलमध्ये ११ रोजी दत्तजयंती उत्सव

■ अलिबाग



अलिबाग तालुक्यातील रेवदंडा चौल गावात बुधवार ११ डिसेंबर रोजी दत्तजयंती उत्सव पार पडणार आहे. त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तरी या उत्सवाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अरुण विचारे, सागर विचारे, भारत वाडकर, राजू पाटील यांनी केले आहे.

भिवंडी एस.टी. स्थानकात दत्तजयंतीनिमित्त हरिनाम सप्ताह

■ भिवंडी

गेले ४१ वर्षे एस.टी. भिवंडी स्थानक येथे दत्तजयंतीचे औचित्य साधून येथील एस.टी.कर्मचारी यांच्या स्थानकावर असलेल्या दत्तमंदिरात ५ डिसेंबर ते १२ डिसेंबर दरम्यान हरिनाम सप्ताह साजरा होत आहे.

या सप्ताह काळात प्रसिद्ध असे प्रवचनकार व रात्री ९ ते ११ च्या दरम्यान हरि किर्तनाचा लाभ श्रोत्यांना लाभणार आहे. सकाळी गुरुचरित्राचे पारायण दुपारी ३ ते ५ महिला भजन कार्यक्रम, सायं. ५ ते ६ प्रवचन व रात्री ९ ते ११ किर्तन सेवा असे कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. तसेच दुपारी व रात्री दररोज अन्नप्रसादही होत असतो. मार्गशीर्ष पौर्णिमेला सकाळी ९ ते ११ दरम्यान या सप्ताहाची सांगता समारंभ असून याचा महाप्रसाद भाविक भक्तांना मोठ्या प्रमाणात दिला जाणार आहे. या सप्ताहाचे नियोजन एस.टी.कर्मचाऱ्यांच्या वतीने दत्ता पवार आणि सामाजिक कार्यकर्ते बी.बी.राक्षे यांनी श्रमपूर्वक केले आहे. तरी अशा या हरिनाम सप्ताहाचा आनंद भाविक भक्तांनी आवर्जुन घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

भगवान दत्तात्रयांना अभिषेक घालून ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सुरू

■ नेवासा, प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड येथे श्री दत्तजयंती महोत्सवास गुरुवारी ५ डिसेंबर रोजी गुरुवर्य भास्करगिरी महाराजांच्या हस्ते भगवान दत्तात्रयांना अभिषेक घालून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाने शुभारंभ करण्यात आला. १२ डिसेंबरपर्यंत हा सोहळा चालणार असून बुधवार ११ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता भगवान दत्तात्रयांचा मुख्य जन्मसोहळा होणार आहे.

भू-लोकीचा स्वर्ग अशी श्री क्षेत्र देवगडची ओळख संपूर्ण देशाला झाली आहे.श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या कृपा आशिर्वादाने श्री दत्त जयंती महोत्सवास गुरुवारी ५ डिसेंबर रोजी गुरुवर्य भास्करगिरी महाराजांच्या हस्ते भगवान दत्तात्रयांना वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला. त्यानंतर श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या समाधीचे पूजन गुरुवर्य भास्करगिरी महाराजांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंदिरात गीतापाठ करून गुरुचरित्र पारायण करण्यात आले.

विरारमध्ये सामुहिक पारायण सोहळा सुरू

■ विरार

भगवान श्री विष्णुंनी जगाच्या कल्याणाकरिता अनेक विविध अवतार धारण केले. त्यातील भगवान श्री दत्तात्रेय हा अवतार जगाचे गुरुपद घेवून अखिल विश्वाला मार्गदर्शन करण्यासाठी घेतला. परब्रम्ह भगवान श्री स्वामी समर्थ महाराज व प.पु. गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे (प्रमुख-अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ - त्र्यंबकेश्वर) यांच्या कृपा आशीर्वादाने अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ -त्र्यंबकेश्वर, श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास (दिंडोरी प्रणित) मार्ग जि. नाशिक, शाखा विरारच्या वतीने श्री दत्तजयंतीनिमित्त अखंड नामजप यज्ञ सप्ताह गुरुवार ५ डिसेंबर ते गुरुवार १२ डिसेंबर रोजी श्री मंगलमूर्ती मंदिर ट्रस्ट हॉल, जुने विवा कॉलेजजवळ, विरार (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आला आहे.

पीएमसी खातेधारकांना हायकोर्टाकडून दिलासा नाहीच

■ मुंबई, प्रतिनिधी

पंजाब अँड महाराष्ट्र बँक घोटाळ्याप्रकरणी मेटाकूटीला आलेल्या बँकेच्या खातेदारांना दिलासा देण्यास उच्च न्यायालयाने आज नकार दिला. बँकेच्या खातेधारकांनी आरबीआय विरोधात दाखल केलेल्या सर्व याचिका न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती रियाझ छागला यांच्या खंडपीठाने फेटाळून लावल्या. भारतीय बँकांशी संबंधित सर्व निर्णय घेण्याचे अधिकार केवळ आरबीआयलाच आहेत तेच या क्षेत्रातील सार्वभौम आहेत. असे स्पष्ट करत न्यायालयाने आरबीआयने

■ सर्व याचिका फेटाळल्या

■ आर्थिक निर्बंध हटवण्यास नकार

पीएमसी बँकेवर लावलेले आर्थिक निर्बंध हटवण्यास नकार दिला.

आरबीआयने घातलेल्या निर्बंधांमुळे पंजाब आणि महाराष्ट्र बँकेतील (पीएमसी) खातेदारांना आपल्या खात्यातून रक्कम काढण्यात अनेक अडचणी येत आहेत.



या शिवाय पीएनबी बँकेच्या घोटाळ्यामुळे आतापर्यंत चार खाते दारांचा मृत्यू झाला आहे.आरबीआयने पीएनबी बँकेवर घातलेले निर्बंध हटवावेत तसेच ग्राहकांना आपल्या खात्यातून जास्तीत जास्त रक्कम काढण्याची मुभा देण्यात यावी अशी मागणी करत प्राजक्ता वायकर यांच्यावतीने तमसीन मोनिस यांनी तर कंन्झूमर ॲक्शन नेटवर्क,हरेश रायसिंगानी यांच्यासह तीन आणि एक जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत तया याचिकांवर न्यायमूर्ती न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या खंडपीठा समोर आज झाली.

मावळ तालुक्यात भानामतीचा प्रकार

■ मावळ

मावळ तालुक्यातील लोणावळा तुंग गावातील इसार शाळेजवळ असलेल्या एका झाडावर मावळ तालुक्यातील प्रतिष्ठित नऊ जणांचे फोटो चिकटऊन त्यावर जादूटोणा अर्थात भानामतीचा प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. जादूटोणा करण्यात आलेल्या नागरिकांमध्ये जमिनीची खरेदी-विक्री करणाऱ्या प्रसिद्ध उद्योगपती तसेच तालुक्यातील प्रगतशील शेतकऱ्यांचा समावेश आहे. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. अशोकाच्या एका झाडाला मावळ तालुक्यातील प्रतिष्ठित नऊ नागरिक पांडुरंग कृष्णा जांभुळकर, संदीप एकनाथ पठारे, किसन बंडु ठोंबरे, योगेश घाडगे, संजय कोकरे, संतोष हघारे, कश्चर शेख, अजय मेहता आणि मनोज सेनानी यांचे फोटो खिळ्याने ठोकले आहेत.

महावितरण

जाहीर निवेदन

मुरबाड उपविभागातील सर्व विज ग्राहकांना कळविण्यात येते वाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी दि. ०६.१२.२०१९ रोजी खाली नमुद केलेल्या भागाचा विज पुरवठा बंद राहील कृपयाचाची नोंद घ्यावी. ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोईबद्दल महावितरण कंपनी दिलगीर आहे.

अनु क्र.	स्विचिंग स्टेशन	दिनांक	वेळ	फिडर	भागाचे नाव
१	मुरबाड उपकेंद्र	०६.१२.२०१९	१४.०० ते १७.००	टाईगर स्टील	मुरबाड एम. आय. डी. सी. एरिया, पवाळे व शिरगांव फिडर
२	मुरबाड उपकेंद्र	०६.१२.२०१९	१०.०० ते १६.००	सरळगाव	सरळगाव व मुरबाड (ग्रा) शाखे अंतर्गत असलेले ग्राहक
३	मुरबाड उपकेंद्र	०६.१२.२०१९	१०.०० ते १६.००	एम. आय. डी. सी. १	मुरबाड एम. आय. डी. सी. एरिया
४	मुरबाड उपकेंद्र	०६.१२.२०१९	१२.०० ते १५.००	पवाळे	पवाळेए कुडवलीए भाळूकए नांकासवाडी व ईतर

कार्यकारी अभियंता
कल्याण ग्रामिण विभाग

अपघातात एकाचा मृत्यू

मुंबई, प्रतिनिधी- गावदेवी येथे भरवेगात जाणाऱ्या कारची बाईकला धडक लागून झालेल्या प्रदीपकुमार रामकरण सिंग या ३९ वर्षीय बाईकस्वाराचा मृत्यू झाला. याप्रकरणी गावदेवी पोलिसांनी हलगर्जीपणाने कार चालवून एका व्यक्तीच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कारचालका-विरुद्ध गुन्हा नोंदविला होता. नंतर त्याला अटक केली.

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: एक्स्चेंज स्क्वेअर, सीटीएस २५५, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.
सी आय एन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

सूचना

सूचना देण्यात येते की, कंपनीची विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक २४ डिसेंबर २०१९ रोजी दुपारी १.०० वाजता, एक्सचेंज स्क्वेअर, सीटीएस २५५, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३ येथे अल्पकालीन सूचनेद्वारे, आयोजित करण्यात येणार आहे. सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे विशेष सर्वसाधारण सभेचे कामकाज होईल. सदर सूचना, प्रॉक्सी फॉर्म व उपस्थिती स्लिपसह सर्व सदस्यांना ई-मेलमार्फत दिनांक ५ डिसेंबर, २०१९ रोजी पाठविली गेली आहे आणि ती कंपनीचे संकेतस्थळ https://www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.

सभेत उपस्थित राहण्याचा आणि मतदानाचा हक्क असणाऱ्या सदस्याला, सभेत उपस्थित राहणे व मतदान करणेसाठी, स्वतः ऐवजी स्वतःचा प्रॉक्सी/प्रॉक्सींची नेमणुक करता येईल. प्रॉक्सी कंपनीचा सदस्य असणे आवश्यक नाही. प्रॉक्सी नेमणुक प्रभावीपणे होण्यासाठी, प्रॉक्सी फॉर्म, सभा सुरु होण्याच्या ४८ तासापूर्वी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

सभेमध्ये होणाऱ्या कामकाजाशी संबंधित कागदपत्रे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभेच्या तारखेपर्यंत कंपनीच्या कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत तपासणीसाठी उपलब्ध असतील.

बोर्डाच्या आदेशानुसार
मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
मंदार कुलकर्णी
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०५ डिसेंबर, २०१९

येवला येथे दोन कारच्या अपघातात
५ जण गंभीर जखमी

■ नाशिक



औरंगाबाद राज्य महामार्गावर येवल्याजवळ दोन कारची धडक होऊन अपघात झाला. या अपघातामध्ये ५ जण गंभीर जखमी झाले आहे. ही घटना आज सकाळी आठच्या सुमारास घडली.

येवल्यामध्ये रस्त्याच्या कडेला एक कार उभी होती. दरम्यान, पाठीमागून आलेल्या ब्रिझा कारने उभ्या कारला जोरदार धडक दिली. या अपघातात ५ जण गंभीर जखमी झाले असून, उभ्या असलेल्या कारमधील महिलांना जबरदस्त मार लागला आहे. दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान झाले आहे. जखमींना येवला येथील काकड खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे.

आता डॉक्टरांवरील हल्ल्याची नोंद होणार

■ पुणे

राज्यातील डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्यांबाबत वैद्यकीय क्षेत्रात चिंता व्यक्त होत असताना आता डॉक्टरांसह रुग्णालयांवर होणाऱ्या हल्ल्याची तसेच तोडफोडीची नोंद करण्यासाठी रजिस्ट्री तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) राज्य शाखेने पुढाकार घेतला असून त्या करिता राज्यातील सर्व शाखांसह रुग्णालये; तसेच डॉक्टरांना सूचना दिल्या आहेत. त्यामुळे आता कोणत्या शहरात, कोणत्या डॉक्टरांवर कशा प्रकारचे हल्ले झाले आहेत, याची नोंद ठेवली जाणार आहे.

राज्य आयएमएचे अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. त्या वेळी आय़एमएच्या पुणे शाखेचे अध्यक्ष आणि राज्य शाखेचे उपाध्यक्ष डॉ. संजय पाटील, सहसचिव डॉ. राजू वरियानी उपस्थित होते.

पुण्यात ८ डिसेंबर रोजी पं.सरनाईक संगीत महोत्सव

पुणे- जयपूर-अत्रौली घराण्याचे ज्येष्ठ गायक पंडित निवृत्तीबुवा सरनाईक यांच्या स्मृतीनिमित्त येत्या ८ डिसेंबरला सरनाईक संगीत महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाचे यंदा दहावे वर्ष असून, यंदा प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. आनंद भाटे आणि युवा कलाकार गंधार राम देशपांडे यांचे गायन होणार आहे. या वेळी गंधार देशपांडे यांना पं. निवृत्तीबुवा सरनाईक युवा पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. कोथरूड येथील मयूर कॉलनीतील बालशिक्षण संस्थेच्या सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता महोत्सव होणार आहे. महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला असून, प्रवेशिका आवश्यक आहेत. राजेंद्र सरनाईक, पं. विनोद डिग्रजकर, लता गोडसे यांची समिती आणि पं. निवृत्तीबुवा सरनाईक प्रतिष्ठानतर्फे हा महोत्सव आयोजित करण्यात येतो.

शैक्षणिक सहलीसाठी ५० टक्क्यांची सूट

गोंदिया- प्रवासाच्या भरमसाठ खर्चामुळे शैक्षणिक सहलीपासून विद्यार्थी वंचित राहू नये यासाठी राज्य परिवहन महामंडळाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. परिवहन मंडळाने शाळांना शैक्षणिक सहलीसाठी प्रवासदरात थेट ५० टक्क्यांची सूट दिली आहे. विशेष म्हणजे, यामध्ये शाळांना जीएसटी लागणार नाही. परिवहन महामंडळाच्या या योजनेचा शाळांनी लाभ घेतला असून, त्यातून गोंदिया एस.टी आगाराला २३ लाख ६ हजार ८०० रूपयांचे उत्पन्न मिळाले आहे. माहिती देताना गोंदिया आगार प्रमुख संजना पटले वर्षभर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना सहलीच्या माध्यमातून थोडा विरंगुळा मिळावा व त्यांच्या ज्ञानात भर पडावी या दृष्टीने शाळांकडून शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते.

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मध्य मुंबई (सा. बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८.

Email :- centralmumbai.ee@mahapwd.com	☏ ४९३६४०४ / २४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२
जा.क्र.का.अ./ममुंवि/ई-निविदा/७८४६	दिनांक :- ३/१२/२०१९

ई निविदा सूचना क्रमांक ३२ सन २०१९-२०

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील मजूर सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून खालील कामाकरीता ''बी-१'' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **http://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नाव :-	१	कावेरी गोमती शरावती इमारतीच्या समोरील मोकळ्या जागेत पेव्हर ब्लॉक बसवून सौदर्यीकरण करणे.	₹ १७०५०१८/-
	२	माटुंगा किंग्ज सर्कल येथील ९६ हवालदार निवासस्थाने बी ब्लॉक येथील अंतर्गत गिलावा व रंगकाम करणे.	₹ १७२२४१२/-
	३	विशेष दुरुस्ती अंतर्गत परेल येथील लेबर स्टडीज इमारत हॉस्टेल इमारतीमधील बाह्य गिलावा व रंगकाम दुरुस्ती व इमारतीमधील ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे.	₹ १८४४४०३/-
	४	विशेष दुरुस्ती अंतर्गत भोईवाडा येथील पोलीस स्टेशन कंपाऊंडमधील लॉकअप व अतिरिक्त पोलीस लॉकअप इमारतीमधील बाह्य गिलावा व रंगकाम दुरुस्ती व इमारतीमधील ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे.	₹ १९९८३७४/-
	५	विशेष दुरुस्ती अंतर्गत परेल येथील लेबर स्टडीज इमारत हॉस्टेल इमारतीमधील बाह्य गिलावा व रंगकाम दुरुस्ती व इमारतीमधील ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे.	₹ १८८४७४६/-
	६	वार्षिक देखभाल दुरुस्ती बीडीडी चाळ क्र.१ ते १०.एनएम जोशी मार्ग मुंबई.	₹ २६३१८७०/-
	७	अग्रीपाडा पोलीस स्टेशनच्या अंतर्गत पोलीस इमारतीची तातडीने दुरुस्ती करणे.	₹ १७६७९३९/-

ई-निविदा उपलब्ध कालावधी -	दि. ०६/१२/२०१९, सकाळी १५.०० पासून ते दि. २०/१२/२०१९ रोजी १५.०० पर्यंत
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)	दि. २१/१२/२०१९, रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा. बां.) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८)

खालील संकेतस्थळावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1) http://mahapwd.com
2) http://mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग
वरळी, मुंबई

डीजीआयपीआर./२०१९/२०२०/३९५०

जाहीर नोटीस

महाराष्ट्र गलिच्छवस्ती (सु.नि.वपू.) न्यायाधिकरण गृहनिर्माण भवन,
कलानगर वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

खालील परिशिष्ट दर्शविलेल्या चारकामी या न्यायाधिकरणापुढे उप जिल्हाधिकारी (अति.) व सक्षम अधिकारी यांनी जाहीर केलेल्या गलिच्छ वस्ती घोषणेविरुद्ध अपिल दाखल केले आहे. सदर मिळकतीतील रहिवाशांना महाराष्ट्र गलिच्छवस्ती अधिनियम १९७१ मधील कलम ४ (५) अन्वये या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर रहिवाशांनी तसेच हितसंबंधितांनी या न्यायाधिकरणापुढे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत त्याचे म्हणणे लेखी स्वरुपात दाखल करावे तसे न केल्यास सदर रहिवाशांना काहीही मांडावयाचे नाही असे समजून अपिलाचे सुनावणी केली जाईल याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

अ. क्र.	अपिलाचे नाव	अपिल क्र.	मिळकतीचे वर्णन	जाहीर झालेली अधिसूचना क्र.	राजपत्राचा दिनांक
१ २	श्री. रविन्द्र पांडुरंग मांजरेकर व ३४ इतर विरुद्ध कीयलाँड डेव्हलपर्स प्रा. लि. व ४ इतर	१/२०१७	C.T.S. No. 181, 181/2 to 181/71, total admeasuring 1985.9 sq. meters of village,. pahadi, Goregaon (E), Mumbai - 400063	**PUBLIC NOTICE** 1) SLUM REHABILITATION AUTHORITY NO. SRA/ Dy.CoLL/3C/ Shree Siddhivinayak CHS/2015/450 २) आदेश जा.क्र. झोपुप्रा/उजि/३क/ श्री सिद्धिविनायक/ आदेश/ २०१६/११३	०५.०३.२०१६ ३० नोव्हें. २०१६

दिनांक: ०४-१२-२०१९
मुंबई ४०००५१

शिक्का

कविता तोंडे
प्रबंधक
महाराष्ट्र गलिच्छवस्ती (सु.नि.वपू.)
न्यायाधिकरण गृहनिर्माण भवन, कलानगर वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१

भारत सरकार
अणु ऊर्जा विभाग
बांधकाम, सेवा व मालमत्ता व्यवस्थापन संचालनालय
मध्यवर्ती मात्रा विभाग

पूर्व-अर्हता तसेच ई-निविदा आमंत्रण सूचना

मुख्य, ईएसडी-II / एचअँण्डसीएमएस , डीसीएसईएम, डीएई, व्ही.एस. भवन, अणुशक्तीनगर, मुंबई-९४ हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांकरीता पात्र कंत्राटदारांकडून ई-निविदेच्या माध्यमातुन (दोन बोलीमध्ये) ऑनलाईन वस्तु दर निविदा आमंत्रित करीत आहेत.

१. निआसु क्र. डीसीएसईएम/सीक्युडी/क्युएसबी/१०७/२०१९-२० दि. ०४.१२.२०१९
कामाचे नाव : अणुशक्तीनगर, मुंबई येथील स्टेअरकेस डोअर, टेरेस हाफ्ट कव्हरींग, स्टेअरकेस रेलिंग करीता किरकोळ रचनात्मक स्टील कामे करणे. अंदाजित मुल्य रू. ७.८९ लाख, बरज रू. १५,७८०.००, पुर्तता कालावधी : ०६ महिने, निविदा प्रक्रिया शुल्क रू. ५९०.०० ई-पेमेंट द्वारे.

२. निआसु क्र. डीसीएसईएम/सीक्युडी/क्युएसबी/१०८/२०१९-२० दि. ०४.१२.२०१९
कामाचे नाव : ओल्ड मंडाला मेंटेनेंस युनिट, मुंबई अंतर्गत ओल्ड मंडाला, ओल्ड ॲण्ड न्यु टीआयएफआर कॉलनी, टीएमसी कॉलनी, ओल्ड मंडाला आणि पायलीपाडा येथील डीएई क्वॉर्टर्स मधील विविध ठिकाणच्या अंडरग्राऊंड वॉटर पाईप लाईन्स वर ब्रेकडाऊन अॅटेंडींग. अंदाजित मुल्य रू. ६.२५ लाख, बरज रू. १२,५००.००, पुर्तता कालावधी : १२ महिने, निविदा प्रक्रिया शुल्क रू. ५९०.०० ई-पेमेंट द्वारे.

३. निआसु क्र. डीसीएसईएम/सीक्युडी/क्युएसबी/१०९/२०१९-२० दि. ०४.१२.२०१९
कामाचे नाव : अणुशक्तीनगर, मुंबई च्या वेस्ट प्रोसेसिंग झोन-I, (ताप्ती इमारती जवळ) येथे कंपोस्टर ड्रम्स/पिट्स सह ऑस्टिनिक वेस्ट चे कंपोस्टींग. अंदाजित मुल्य रू. १७.२२ लाख, बरज रू. ३४,४४०.००, पुर्तता कालावधी : ०६ महिने, निविदा प्रक्रिया शुल्क रू. १,०१६.०० ई-पेमेंट द्वारे.

दस्तावेजांसह सविस्तर निविदा सूचना ही मोफत बघण्याकरीता आणि डाऊनलोड करण्याकरीता वेबसाइट www.tenderwizard.com/DAE वर उपलब्ध आहे. निविदा दस्तावेज हे अवलोकनार्थ / डाउनलोड करण्याकरीता दि. ०६.१२.२०१९ (११ ०० वा.) ते १२.१२.२०१९ (१५ ०० वा) पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा जमा करणे बंद होण्याची तारीख १९.१२.२०१९ रोजी १५ ०० वाजेपर्यंत. बयाना रक्कम जमा करिता हार्ड कॉपीज १९.१२.२०१९ रोजी १५ ०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा ऑनलाईन उघडणे (तांत्रिक बोली) २०.१२.२०१९ रोजी १५ ३० वा. असेल. पात्र बोलीदारांच्या वित्तीय बोली ह्या नंतरच्या तारखेला वेगळी सूचना देऊन उघडण्यात येतील. सविस्तर निआसु हे फक्त बघण्याकरीता www.dcsem.gov.in वर सुद्धा उपलब्ध राहतील. अधिक माहितीकरीता कृपया ०२२- २५४८७३३४, २५४८७३३७ फॅक्स : ०२२-२५५६५३६२ वर संपर्क साधावा.